**प्रेस नोट**

**१० दिवसाच्या बाळाला विक्री करुन रक्कम स्वीकारणारे बाळाची आई व मध्यस्थी महिला व पुरुष यांच्या विरुध्द एन आर आय सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि क्रमांक ३०४/२०२१ भादवि कलम ३७०, ३४ सह बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ चे कलम ८१ व ८७ अन्वये बाळाची विक्री करत असल्याबाबत गुन्हा दाखल झाल्याबाबत..**

-------------------------------------

सदर गुन्ह्यातील फिर्यादी नामे सौ. अमृता दत्तात्रय गुजर उर्फ शेख वय ३८ वर्षे., धंदा - हॉटेल व्यवसाय, रा. टॉयसिटी ॲव्हेन्यु १००४, सेक्टर २०, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड यांना स्त्री जातीचे लहान बाळ वय अंदाजे १० दिवस हिची विक्री करणार असुन त्याबाबत बालकाच्या जन्माबाबत अगर दत्तक विधानाबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे न देता विक्री करणार आहे असे तक्रारदार यांनी पोलीस ठाणे येथे येवुन कळविले होते.

फिर्यादी यांना मध्यस्थी यांनी फोन करुन बोलवले असता त्याबाबत त्यांनी वपोनि/रविंद्र पाटील यांना माहिती दिली असता फिर्यादी यांनी दिनांक ०५/१२/२०२१ रोजी एन आर आय सागरी पोलीस ठाणे येथे केलेल्या तक्रारी अर्जाची तक्रारी पडताळणी करुन मा. पोलीस उप आयुक्त परि-१, वाशी, नवी मुंबई, मा. सहा. पोलीस आयुक्त तुर्भे विभाग, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन आर आय सागरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले सदर पथकातील पोनि/पृथ्वीराज घोरपडे पोउपनि/मंगेश बाचकर, पोउपनि/राहुल गरड, पोना देवरे, पोना/फंड, पोना/चव्हाण, पोना/वाघमारे, मपोना/बनकर यांना वपोनि/रविंद्र पाटील यांनी सुचना देवुन, त्याप्रमाणे तपास पथक दिनांक ०५/१२/२०२१ रोजी सरकारी पंच, फिर्यादी असे एन.आर.आय.सागरी पोलीस स्टेशन येथून निघून मध्यस्थीने बोलवलेल्या उलवे येथे गेले असता. मध्यस्थीने सदर चे ठिकाण बदलुन त्यांनी फिर्यादी यांना नेरुळ रेल्वे स्टेशन येथे बोलवले त्याप्रमाणे फिर्यादी, पंच, पोलीस असे सदर ठिकाणी पोहोचले फिर्यादी यांना मध्येस्थी यांनी नेरूळ येथील तिरूपती प्रसाद हॉटेलमध्ये बोलाविले होते. त्याप्रमाणे त्या ठिकाणी पोलीस, पंच असे सापळा लावुन थांबले असतांना सदर ठिकाणी मध्यस्थी महिला नामे अनिता आनंद सोष्टे व ज्योती शाहरूख खान या लिफाफा फोडुन त्यापैकी एक बडल मोजण्यासाठी दिला. त्यावेळी फिर्यादी यांनी पंचाना व पोलीसांना इशारा करून बोलाविले, त्याचवेळी महिला पोलीस स्टाफ व समाजसेविका उपस्थित असलेल्या महिलांना व इतर पोलीस स्टाफने त्याठिकाणी फिर्यादी यांचेकडून पैसे स्विकारण्याकरीता आलेल्या महिला व पुरुषांना ताब्यात घेवुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. नवजात १० दिवसाचे बालकाच्या सुरक्षीत ताब्यात घेण्यात आले आहे. व महिला अंमलदारांचे ताब्यात देण्यात आले आहे. नवजात बालकास CWC भिंवडी यांचे समक्ष हजर करण्याची तजविज ठेवली आहे.

**गुन्ह्याचा उद्देश :-**

फिर्यादी यांना १० दिवसाचे बाळ विक्री करुन अर्थिक फायदा मिळवण्यासाठी

**अटक आरोपी यांची नावे**

१) जरिना रहिम शेख, वय ३३ वर्षे., धंदा - गृहिणी, रा. म्हाडा कॉलनी जवळील चाळ, मालाड, मुंबई मुळ रा. मुळ गाव वेलवली, ता. शहापुर, वाशिंद, जि. ठाणे

२) अनिता आनंद सोष्टे, वय ४७ वर्षे. धंदा. गृहिणी रा. रूम नं. ०१, ओम साई अपार्टमेंन्ट, यादवनगर, आंबिवली, कल्याण, जि. ठाणे, मुळ गाव वेलवली, ता. शहापुर, वाशिंद, जि. ठाणे

३) शुभम आनंद सोष्टे, वय २४ वर्षे धंदा - बेकार, रा. म नं. ०१, ओम साई अपार्टमेंन्ट, यादवनगर, आंबिवली, कल्याण, जि. ठाणे, मुळ गाव वेलवली, ता. शहापुर, वाशिंद, जि. ठाणे

४) ज्योती शाहरूख खान, वय २८ वर्षे., व्यवसाय - कॅटरस, रा. रूम नं. ००२, तकदिर रेसिडेन्सी, नागदेवी मंदिराचे बाजुला, सिवुड, नवी मुंबई, मुळ रा. सायन कोळीवाडा, जी.टी.बी.नगर, मेट्रो स्टेशनजवळ, मुंबई.

५) शाहरूख खुर्शिद खान, वय २८ वर्षे., धंदा - कॅटरस, रा. रूम नं. ००२, तकदिर रेसिडेन्सी, नागदेवी मंदिराचे बाजुला, सिवुड, नवी मुंबई, मुळ रा. ग्राम हतरगी, ता.जि. बिजापुर, राज्य - कर्नाटक

**गुन्ह्यात जप्त मुद्देमाल**

१) आरोपी यांच्याकडुन जप्त करण्यात आलेले ०४ मोबाईल

२) पॅनकार्ड

३) बनावट पन्नास हजार चे ०५ बडल

त्यावरुन एन आर आय सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि क्रमांक ३०४/२०२१ भादवि कलम ३७०, ३४ सह बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ चे कलम ८१ व ८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पुढील तपास करीत असतांना आरोपी यांना अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा हेतु तसेच गुन्हयातील इतर बार्बीबाबत पुढील सखोल तपास पोलीस उप निरीक्षक श्री. राहुल गरड हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस आयुक्त श्री. बिपीन कुमार सिंग, मा. पोलीस सह आयुक्त श्री. जय जाधव, मा. पोलीस उप आयुक्त श्री. विवेक पानसरे परिमंडळ ०१ वाशी, सहा. पोलीस आयुक्त श्री. गजानन राठोड तुर्भे विभाग, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र पाटील, पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, पोलीस उप निरीक्षक/मंगेश बाचकर, पोउपनि/राहुल गरड, पोना देवरे, पोना/फंड, पोना/चव्हाण, पोना वाघमारे, मपोना/बनकर यांनी पार पाडली.